# दहिसर, बोरिवलीमध्ये कोविड केअर केंद्र उभारणार

मुंबई : राज्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत असून प्रशासनाने त्यासाठी उपाययोजना सुरू केली आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) दहिसर चेकनाका तसेच बोरिवली कांदरपाडा येथे कोविड केअर केंद्र उभारण्यात येत आहे. पश्चिम उपनगरांतील कोरोनाची लागण झालेल्यांची वाढती संख्या पाहता या ठिकाणी कोविड कक्ष उभारण्याची मागणी शिवसेना उपनेते विनोद घोसाळकर यांनी केली होती. दहिसर जकात नाका येथे ८०० ऑक्सिजनयुक्त बेडची व्यवस्था असणार आहे. तर बोरिवली आरटीओ कार्यालयाजवळील कांदरपाडा येथे डायलिसिस सुविधा असणारी २२० बेडची अतिदक्षता विभागाचे एक अलगीकरण केंद्र बांधण्यात येणार आहे. याबाबत एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी सुरू झालेले हे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले असून येत्या दोन आठवड्यात ते पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.